# कोल्हापूर महानगरपालिका

पोस्ट बॉक्स नं. ३३, पिन कोड नं. - ४१६ ००२

फोन नं.-पी.बी.एक्स्. बोर्ड २५४०२९१ ते २५४०२९८

---

जावक क्र. – नगररचना विभाग/बांधकाम नियमितीकरण/वशि क्रि-६८/२०१८-२०१८ दिनांक -१५/१०/२०१८

16/10/2018

## -: नियमितीकरण प्रमाणपत्र (भोगवटा) :-

प्रति,

सौ.विजया पांडुरंग हजारे तर्फे वटमुखत्यार

श्री. चंदुलाल कल्याणजी शाह

रा. बी वॉर्ड,रि.स.नं. ६१३अ/२/१ भूखंड क्र. ९,१०,११

व रि.स.नं. ६१३अ/१क पैकी भूखंड क्र. ३ ए, कोल्हापूर

विषय :- बी वॉर्ड,रि.स.नं. ६१३अ/२/१ भूखंड क्र. ९,१०,११ व रि.स.नं. ६१३अ/१क पैकी भूखंड क्र. ३ ए या इमारतीचे बांधकाम नियमतीकरण (भोगवटा) करणेबाबत....

संदर्भ :- १) इकडील दिनांक ३०/०७/२०१० रोजीची बांधकाम परवानगी

२) इकडील दिनांक २९/०२/२०११ रोजीची सुधारित बांधकाम परवानगी

३) आपला नोंद नं. २/६३,दिनांक ०१/०१/२०१८ रोजीचा अर्ज.

विषयांकित जागेवर संदर्भ क्र.१ ने इमारत बांधकामास विभागीय कार्यालयाकडुन बांधकाम परवानगी दिनांक ३०/०७/२०१० व दिनांक २९/०२/२०११ रोजीने दोन रो बंगला नं. ५ व ६ व पश्चिमेकडील १ इमारत व उत्तरेकडील १ इमारत अशी बांधकाम परवानगी देणेत आलेली होती. संदर्भ क्र. ३ अन्वये दोन रो बंगले व पश्चिमेकडील इमारती करीता नियमितीकरणसाठी (भोगवटा)मागणी केलेली आहे. सदर कामी जागेवर प्रत्यक्ष पाहणी केली असता मंजूर नकाशामध्ये झालेली असून व फेरफार केलेला असून कपाटचे वाढीव बांधकाम केलेले आहे. सदर कामी अंतर्गत फेरफार रक्कम रूपये ५,०००/-, व प्रिमियम रक्कम रूपये ३६,६३०/- अशी **एकुण ४१,६३०/- इतकी रक्कम कोल्हापूर महानगरपालिका, मुख्य सी.एफ.सी.मध्ये** पावती नं. ४१६३६० ,दिनांक १५/०९/२०१८ रोजीने भरलेली आहे.

तरी या सर्व बाबी पाहता बांधकाम पुर्ण करून मुळ बांधकाम परवानगी पासुन विहीत चार वर्षाच्या मुदतीत भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही त्यामुळे बांधकाम उपविधी व विकास नियंत्रण नियमावली मधील तरतूदीनुसार दिनांक ३०/०७/२०१० व दिनांक २९/०२/२०११ रोजीने रोजीचे बांधकाम परवानगी कामी भरलेली अनामत रक्कम रूपये अनुक्रमे १३,२००/- + ११५८००/- अशी एकुण १,२९,०००/- इतकी महानगरपालिकेकडे खास जमा करणेत आलेली आहे.

सबब मा.आयुक्त द.ठ.नं.८,दिनांक ०५/०७/२००७ मधील तरतूदीनुसार दिनांक २९/०२/२०११ रोजीचे सुधारित मंजूर परवानगीतील अटी व शर्ती,व वरील अटीस अधिन राहून बांधकाम नियमितीकरण (भोगवटा) करणेत येत आहे.

Psmahajan

आयुक्त

कोल्हापूर महानगरपालिका,करीता